दिनांक 28/04/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.11

विषय – विटा नगरपरिषद घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येथे निर्माण होणाऱ्या खताची विक्री करणेसाठी पोती खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सह.भांडार पर्यवेक्षक विभाग प्रमुख यांची दिनांक 28/04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

विटा नगरपरिषद घनकचरा प्रकल्प येथे ओल्या कचऱ्यापासून कम्पोस्ट खत तयार केले जाते. नगरपरिषद मार्फत निर्माण केलेल्या खताला हरित ब्रँड देखील मिळाला आहे. निर्माण होणारे खत नागरिकांपर्यंत पोचविण्यासाठी नगरपरिषद कार्यालय येथे खत विक्री केंद्र सुरु करण्यात आले आहे. तसेच नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात मागणी देखील येत आहे. आता नगरपरिषदमार्फत 40 किलोच्या पोत्यातून विक्री केली जाते. तरी मा. मुख्याधिकारी यांच्या दिनांक 11/04/2023 रोजीच्या सुचनेनुसार 5 किलो, 10 किलो, 25 किलो, 40 किलोच्या वजनाच्या पोती, बॅगमधून खत विक्री करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी 5 किलो, 10 किलो, 25 किलो, 40 किलो वजनाची पोतीवर छपाई करून 2000 पोती खरेदी करणे आवश्यक आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ क्र | तपशील | नग |
|---|---|---|
| 1 | 5 किलो | 700 |
| 2 | 10 किलो | 300 |
| 3 | 25 किलो | 500 |
| 4 | 40 किलो | 500 |

तरी वरीलप्रमाणे एकूण 2000 पोतीवर छपाई करून पोती खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 28/04/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.12

विषय – नगरपरिषद घनकचरा प्रकल्प येथील बायोगॅस जनरेटर दुरुस्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सह.भांडार पर्यवेक्षक विभाग प्रमुख यांची दिनांक 28 /04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

घनकचरा प्रकल्प येथील बायोगॅस जनरेटर नादुरुस्ती झाल्याने सध्या बंद आवस्थेत आहे. त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर बायोगॅस जनरेटर सन 2018-2019 या साली खरेदी करण्यात आला होता. त्याची वॉरंटी एक वर्ष होती परंतू आजपर्यंत त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही. सदरची दुरुस्ती केल्याने जनरेटर पुन्हा कार्यरत होईल. तरी त्याचा अंदाजे खर्च रक्कम रूपये 70,000/- इतका आपेक्षित आहे. यासाठी खालील कामे करणे आवश्यक आहे.

| अ क्र | दुरुस्ती तपशील | नग |
|---|---|---|
| 1 | Oil change | 20 लीटर |
| 2 | Spin on lube oil filter | 2 |
| 3 | Genuine Coolant premix 5 lit | 1 |
| 4 | HT cable set | 6 |
| 5 | Spark plug size M12 | 6 |
| 6 | Freight charges | - |

तरी बायोगॅस जनरेटर दुरुस्ती करणे व तदनुषंगिक कामे करणेस मंजुरी देत आहे. सदरचे काम नपा फंडातून करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा